# पन्हाळा-पावनखिंड शिवशौर्यगाथा पदभ्रमंती मोहीम संपन्न

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी आणि दत्ताजीराव कदम आर्ट्स,सायन्सअँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित दि.२ आणि ३ जानेवारी २०२६ रोजी पन्हाळा-पावनखिंड शिवशौर्यगाथा पदभ्रमंती मोहीम जवळपास २०० विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाने संपन्न झाली.सदर मोहिमेचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पन्हाळा नगराध्यक्षा मा.श्रीमती जयश्री पोवार,उपनगराध्यक्ष मा. सतीश भोसले,माजी उपनगराध्यक्ष मा. चेतन भोसले आणि इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे जवळपास १२० हून ज्यादा विद्यार्थीनींनी हा खडतर ट्रॅक पूर्ण केला.

स्वराज्यासाठी बलिदान दिलेल्या बाजीप्रभू देशपांडे आणि शूर मावळयांच्या बलिदानास नमन म्हणून सदर मोहिमेचे आयोजन करण्यात आले.पन्हाळा राजदिंडी मार्गावरून सुरु झालेली ही पदभ्रमंती मोहीम मसाईच्या विस्तीर्ण पठारावरून प्रचंड पाऊस,चिखल,दलदलीतून मार्ग काढत अनेक छोटी गावे पार करत करपेवाडी येथे मुक्काम करण्यात आला.दरम्यान मसाई पठार येथे डी. के. ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजीचे वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. संदीप गावडे यांनी अत्यंत दुर्मिळ फुलांची माहिती सांगताना तेथील जैवविविधतेचे महत्व विषद केले.संध्याकाळी करपेवाडी येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते प्रा. मधुकर

पाटील यांचे “पावनखिंडीचा रणसंग्राम” या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.यावेळी विवेकानंद महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील प्रमुख उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ऐतिहासिक गाणी,काव्ये,शाहिरी सादरीकरण विद्यार्थ्यांकडून सादर झाले. त्यानंतर करपेवाडी ते पांढरपाणी हा टप्पा यशस्वीपणे पूर्ण करून पावनखिंडीत या मोहिमेचा समारोप झाला.सदर मोहिमेत श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजीच्या प्र. प्राचार्य डॉ. श्रुती जोशी,दोन्ही महाविद्यालयाचे एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील भोसले,डॉ. धीरज शिंदे,प्रा. अंकुश कुरणे,प्रा. स्वाती हळवणकर,प्रा. निशा सुर्वे,प्रा. रोहिणी रेळेकर,प्रा. राहूल कांबळे,प्रा. संदीप पाटील,प्रा. निलेश जाधव,डॉ. सुभाष जाधव,प्रा. पूजा परिशवाड,प्रा. वर्षा शिंदे,प्रा. रुपाली सांबरे,डॉ महबूब माणगावे,डॉ संदीप लोखंडे यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.सदर मोहिमेस डी. के. ए. एस. सी. कॉलेजचे प्राचार्य प्रो डॉ एस के खाडे यांचे प्रोत्साहन लाभले.


ICHALKARANJI
SHEFALI
GPS Map Camera
Check In
Ichalkaranji, Maharashtra, India
10, Kolhapur Road, Near Ichalkaranji, Kagwade Mala,
Ichalkaranji, Maharashtra 416115, India
Lat 16.691804° Long 74.451218°
Sunday, 02/08/2026 08:51 AM GMT +05:30
Google


Hill Top





लोकमत



पन्हाळा ते पावनखिंड मोहिमेस शुभेच्छा देताना प्रा. अभयकुमार साळोखे, पन्हाळा नगराध्यक्षा जयश्री पोवार, उपनगराध्यक्ष सतीश भोसले उपस्थित होते.

# पन्हाळा-पावनखिंड मोहिमेमधून युवकांना संघर्ष समजेल : साळुंखे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पन्हाळा :** छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय खडतर स्थितीत पन्हाळगड ते पावनखिंड गनिमी कावा मोहीम यशस्वी केली होती. या मोहिमेत बाजीप्रभू देशपांडे आणि शिवा काशीद यांच्यासह अनेक मावळ्यांनी बलिदान दिले होते. त्यांनी स्वराज्य कसे स्थापन केले, त्यांचा संघर्ष काय होता, हे युवापिढीला समजावे यासाठी मोहिमेचे आयोजन केल्याचे विवेकानंद शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे यांनी सांगितले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी आणि आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथील विद्यार्थ्यांच्या पन्हाळा ते पावनखिंड पदभ्रमंती मोहिमेच्या प्रारंभ प्रसंगी ते बोलत होते. पराक्रमी इतिहासाच्या स्मृती जपण्याच्या उद्देशाने शिवभक्त आणि इतिहासप्रेमी संस्था-संघटनांच्यावतीने जुलै ते ऑगस्ट महिन्यात पन्हाळगड ते पावनखिंड या पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन केले जाते. ही विवेकानंद शिक्षण समूहाची पहिलीच मोहीम आहे. वीर शिवा काशीद आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास प्रा. साळुंखे आणि नगराध्यक्षा जयश्री पोवार, उपनगराध्यक्ष सतीश भोसले यांनी अभिवादन केले आणि पदभ्रमंतीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विवेकानंद शिक्षण समूहाचे विविध मान्यवर उपस्थित होते.

पन्हाळगड ते पावनखिंड मोहिमेत दोनशे युवक आणि युवतींनी सहभाग घेतला होता. पन्हाळगड आणि पन्हाळगड ते पावनखिंड या मार्गावर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.